**नागरी क्षेत्रातील टंचाईग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी तातडीच्या पाणी पुरवठा योजना घेण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक टंचाई-१००१/प्र.क्र.१६५/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- ४ सप्टेंबर, २००२.**

**संदर्भ :-** १) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-२०९९/प्र.क्र.१४/पापु-१४, दि. ०२ फेब्रुवारी, १९९९.
२) महसूल व वन विभाग, पत्र क्रमांक सीएलएस-५९९०/प्र.क्र.७९२/म-३, दि. २८ ऑगस्ट, २००२

**प्रस्तावना :-**

राज्याच्या नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ तातडीच्या उपाययोजना घेण्यासंबंधी शासनाने संदर्भाधीन दि. ०२ फेब्रुवारी, १९९९ च्या शासन निर्णयान्वये स्थायी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार, नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत सर्वसाधारणपणे १) विंधण विहिरी / नलिका कुप घेणे, २) उच्च क्षमतेच्या विंधण विहिर / नलिका कुपवर विद्युत पंप बसविणे, छोटीशी पाईप लाईन व पाण्याची टाकी इत्यादी, ३) अन्य पर्याय उपलब्ध नसतील अशा ठिकाणी नदीचे काठावर, नदीचे पात्रात, तलावाचे खालील बाजूस किंवा तलावात खुली विहिर घेणे, ४) शहराच्या पाणी पुरवठयात वाढ करण्यास उपयुक्त ठरणारी इतर कामे इत्यादी उपाययोजनांना मंजूरी देण्याचे अधिकार काही अटींना अधीन राहून जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच, विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणा-या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना शासन स्तरावर विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येते. नागरी क्षेत्रातील टंचाई निवारण उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी सर्व जिल्हाधिका-यांना **" लेखाशीर्ष २२१५ (योजनांतर्गत) "** अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत होता. सन २००२-२००३ पासून नागरी क्षेत्रातील पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या उपाययोजनांकरिता निधी नैसर्गिक आपत्ती अंतर्गत महसूल व वन विभागाकडून प्राप्त होणा-या **" लेखाशीर्ष २२४५ (योजनेतर) "** खाली उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी लक्षात घेऊन, नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ, क्षेत्रीय स्तरावर तसेच शासन स्तरावर ०१ एप्रिल, २००२ पासून प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या आणि यापुढे मंजूर करण्यात येणा-या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी महसूल व वन विभागाकडून उपलब्ध होणा-या लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०१, अवर्षण १०२, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (एक), निकडीच्या पाणी पुरवठा योजना (२२४५००९३) (योजनेतर) अंतर्गत अनुदान उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

२ सदर योजना मंजूरी व योजना राबविण्याबाबतची कार्यपध्दती, विहित अटी व निकष पूर्वीप्रमाणेच संदर्भ क्र. ०१ येथील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.



५०३

३. विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील योजनांची प्रकरणे, सचिव स्तरावरील समितीकडून मंजूरीकरिता विचारात घेतली जातील व मंजूरी प्रदान केली जाईल. याप्रमाणे सचिवस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.५९१/०२/व्यय-९, दि. १.०६.२००२ अन्वये मिळालेली मान्यता आणि मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ जुलै, २००२ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(रु. न. देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. विभागीय आयुक्त, (सर्व)
२. आयुक्त महानगरपालिका (सर्व) (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून)
३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
४. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१०. सह संचालक लेखा व कोषागरे संगणक कक्ष, नविन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई-३२ (०२ प्रतीसह)
११. सदस्य सचिव (प्रशासन/तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१२. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोंकण भवन, नवी मुंबई
१६. उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र- १, मुंबई (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
१८. महालेखापाल, महाराष्ट्र- २, नागपूर (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
१९. मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपालिका (सर्व)
२०. कक्ष अधिकारी, व्यय-३/व्यय-९/अर्थसंकल्प-३ व अर्थसंकल्प-१९, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. महसूल व वन विभाग, म-७, म-११ व म-३
२२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
२३. निवड नस्ती, पापु-१४